**महाराष्ट्र शासन**

क्र. अधापु २०१५/ प्र.क्र. ११२/ना.पु.-२२
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १६ सप्टेंबर, २०१५.

प्रति,

१) जिल्हाधिकारी, औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा

२) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा

**विषय** :- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या राज्यातील १४ जिल्ह्यांतील एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेप्रमाणे अन्नधान्याचा लाभ देण्यासाठी **माहे सप्टेंबर, २०१५ करिता** सुधारीत (अतिरिक्त) मासिक नियतन.

**संदर्भ** :- १) शासन निर्णय क्रमांक अधापु-२०१५/(प्र.क्र.१००)/नापु-२२, दिनांक २४/०७/२०१५.
२) शासन परिपत्रक क्रमांक अधापु-२०१५/(प्र.क्र.१००)/नापु-२२, दिनांक ५/०८/२०१५.
३) केंद्र शासनाचे क्र. २/महाराष्ट्र/२०१५- बीपी-III, दि. १६/९/२०१५ चे पत्र.

औरंगाबाद विभागातील औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती विभागातील अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व नागपूर विभागातील वर्धा या १४ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या धर्तीवर सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ देण्याबाबत उपरोक्त संदर्भाधीन दिनांक २४/७/२०१५ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) मधील लाभार्थ्यांपैकी शेतकऱ्यांना प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांप्रमाणे प्रतिव्यक्ती ५ किलो अन्नधान्याचे वाटप करण्यात यावे. सदर योजनेच्या लाभाकरिता संदभाधीन दि.५.८.२०१५ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करावे.

सदर योजना दि. १५ ऑगस्ट, २०१५ रोजी सुरु करण्यात आल्यानंतर योजनेच्या प्रत्यक्ष लाभार्थ्यांमध्ये वाढ झाल्याचे क्षेत्रीय कार्यालयांकडून कळविण्यात आल्यानुसार उपरोक्त १४ जिल्ह्यांतील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) मधील लाभार्थ्यांपैकी सुधारीत आकडेवारीनुसार निदर्शनास आलेल्या शेतकऱ्यांना देखील प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांप्रमाणे प्रतिव्यक्ती ५ किलो अन्नधान्याचे वाटप करावयाचे असल्यांने केंद्र शासनास दि. ११.९.२०१५ च्या शासन पत्रान्वये Economic Cost ने अतिरिक्त अन्नधान्य उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती करण्यात आली होती. सदर विनंतीच्या अनुषंगाने केंद्र शासनाने त्यांच्या दि. १६.९.२०१५ च्या पत्रान्वये २३००० मे. टन अन्नधान्य राज्याकरिता उपलब्ध करुन दिले आहे.

२. **उपरोक्त लाभार्थ्यांना अन्नधान्य देण्याकरिता ते केंद्र शासनाकडून Economic Cost ने खरेदी करण्यात यावे. केंद्र शासन / भारतीय अन्न महामंडळाकडून ₹ २२६७०/- प्रति मे. टन दराने गहू व ₹ ३१३४०/- प्रति मे. टन दराने "अ" दर्जाचा तांदूळ खरेदी करण्यात यावा. लाभार्थ्यांना तांदूळ ₹ ३/- प्रतिकिलो व गहू ₹ २/- प्रतिकिलो या दराने धान्य वितरीत करण्यात यावे.**

३. केंद्र शासनाने संदर्भ क्र. ३ मधील दि. १६.९.२०१५ च्या पत्रान्वये Economic Cost ने २३००० मे. टन अन्नधान्य (गहू १३८०० मे.टन व तांदूळ ९२०० मे.टन) उपलब्ध करुन दिले आहे. दिनांक २४/७/२०१५ रोजीच्या

शासन निर्णयानुसार राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत समाविष्ट नसलेल्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक वाढीव शेतकऱ्यांना अन्नधान्य देण्यासाठी याद्वारे माहे सप्टेंबर, २०१५ करिता अन्नधान्याचे सुधारीत (अतिरिक्त) नियतन मंजूर करण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या उपरोक्त पत्रान्वये प्राप्त झालेल्या नियतनाच्या आधारे उपरोक्त १४ जिल्ह्यांकरिता त्या-त्या जिल्ह्यांतील सुधारीत लाभार्थ्यांची संख्या विचारात घेऊन प्रतिव्यक्ती ५ किलो याप्रमाणे माहे सप्टेंबर, २०१५ करिता अन्नधान्याचे जिल्हानिहाय सुधारीत (अतिरिक्त) नियतन तयार करण्यात आले असून त्याबाबतचे विवरणपत्र सोबत जोडले आहे. सदर नियतन तयार करताना जिल्ह्यातील सुधारीत (अतिरिक्त) लाभार्थ्यांकरिता आवश्यक असलेले एकूण नियतन स्तंभ क्र. ६, ७ व ८ मध्ये दर्शविण्यात आले असून त्यानंतरच्या स्तंभ क्र. ९, १० व ११ मध्ये दि. ९.९.२०१५ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या नियतनाची आकडेवारी दर्शविण्यात आली आहे. त्यानंतरच्या स्तंभ क्र. १२, १३ व १४ मध्ये आवश्यक असलेल्या एकूण नियतनातून दि. ९.९.२०१५ च्या पत्रान्वये देण्यात आलेले नियतन वजा जाता उर्वरीत (अतिरिक्त) नियतन दर्शविण्यात आले आहे. दि. ९.९.२०१५ च्या पत्रान्वये दिलेल्या नियतनाची उचल पूर्ण झाल्यानंतर सोबतच्या विवरणपत्रातील स्तंभ क्र. १२ व १३ मध्ये दर्शविलेल्या गहू व तांदळाची उचल सुरु करण्यात यावी.

शासन निर्णय दिनांक २४/७/२०१५ नुसार विहित केलेल्या परिमाणाच्या मर्यादेत गहू व तांदळाचे वाटप करावे.

४. केंद्र शासनाच्या संदर्भाधीन दि. १६.९.२०१५ च्या पत्रामध्ये नमूद केल्यानुसार माहे सप्टेंबर, २०१५ च्या नियतनाच्या उचलीचा व रकमा जमा करण्याचा कालावधी केंद्र शासनाच्या उपरोक्त दि. १६.९.२०१५ च्या पत्राच्या दिनांकापासून ३० दिवसांचा राहील. उचलीच्या अंतिम दिनांकाची वाट न पाहता विहित मुदतीत रक्कम जमा करुन, नियतनानुसार संपूर्ण अन्नधान्याची उचल करुन निश्चित केलेल्या दराने व परिमाणात अन्नधान्याचे वाटप होईल याची दक्षता घ्यावी.

५. शासनाचे सदर नियतन मंजूरीचे आदेश ई-मेलद्वारे व उपआयुक्त (पुरवठा) यांना फॅक्स व ई-मेलद्वारे पाठविण्यात आले आहेत. नियतन मंजूरीचे आदेश प्राप्त न झाल्यामुळे अन्नधान्याची विहित मुदतीत उचल करता आली नाही व त्यामुळे नियतन व्यपगत झाले, ही सबब विचारात घेतली जाणार नाही व याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

६. **भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून गहू व तांदूळ स्विकारताना शासनाच्या निर्देशानुसार नमुने घेऊन संयुक्तपणे धान्याचा दर्जा तपासून तो समाधानकारक असल्याची खात्री करुनच धान्याची उचल करण्यात यावी. यासंबंधी शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच सदर संयुक्त तपासणीच्या वेळी उपस्थित असलेल्या भारतीय अन्न महामंडळाच्या व शासनाच्या प्रतिनिधींची नावे, त्यांचे पद व तपासणीचा दिनांक व स्थळ याबाबतची जिल्हानिहाय माहिती अन्नधान्याची उचल पूर्ण झाल्यानंतर तत्काळ शासनास सादर करावी. सदर माहिती पुढील महिन्याच्या शासनाच्या नियतन आदेशापूर्वी प्राप्त न झाल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

७. शिधापत्रिकाधारकास रास्तभाव धान्य दुकानांच्या माध्यमातून सदर धान्याचे वाटप विहित परिमाणात होत असल्याची खातरजमा करण्याबाबत संबंधितांना सूचना द्याव्यात. अन्नधान्याचे वाटप होत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

८. सार्वजनिक वितरण व्यवस्था नियंत्रण आदेश, २००१ मधील तरतुदीनुसार "उपयोगिता प्रमाणपत्र" नियमितपणे सादर करणे अनिवार्य आहे.

९. सोबतच्या अन्नधान्याच्या नियनताच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या परिमाणानुसारच लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वितरण करणे अनिवार्य आहे.

१०. माहे सप्टेंबर, २०१५ साठी उक्त लाभार्थ्यांकरीता नियतनानुसार गहू व तांदुळाचा साठा मुक्त करण्याच्या सूचना भारतीय अन्न महामंडळास स्वतंत्रपणे देण्यात आल्या आहेत.

११.	मंजूर नियतनानुसार लाभार्थ्यांकरीता गहू व तांदळाची उचल करुन वाटप करावे व केलेल्या उचल व वाटपाची माहिती न चुकता **"महाफूड"** आज्ञावलीत दर आठवडयास वेळीच भरावी. नियतन, उचल व वाटप यासंबंधीची माहिती वेबसाईटवर प्रदर्शित करण्याबाबत शासन स्तरावरुन वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच भारतीय अन्न महामंडळाकडून केलेल्या उचलीबाबतची व रास्तभाव दुकानदारांनी केलेल्या उचलीबाबतची माहिती दररोज उपसंचालक, नागरी पुरवठा यांना सादर करावी.

**( वि. द. शेवडे )**
**अवर सचिव**

सोबत:- विवरणपत्र

प्रत:-

१)	उप आयुक्त (पुरवठा) औरंगाबाद, अमरावती, नागपूर (फॅक्सद्वारे)

त्यांना सूचित करण्यात येते की, नियतनाचे आदेश सर्व जिल्हयांना ई-मेल व पत्राद्वारे पाठविण्यात आले आहेत. आपल्या विभागातील जिल्हयांना सदर आदेश प्राप्त झाले किंवा कसे याबाबत खातरजमा करण्यात यावी. आपल्या विभागातील सर्व जिल्हयांमध्ये नियतनानुसार धान्याची उचल होत असल्याची व त्याबाबतची माहिती **"महाफूड"** आज्ञावलीत दर आठवडयास भरली जाण्याची योग्य ती दखल घ्यावी.

२)	उपसंचालक, नागरी पुरवठा,पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई, यांनी प्रस्तुत नियतनानुसार जिल्हयांनी केलेली उचल व वाटप याबाबतचा तपशील **"महाफूड"** आज्ञावलीद्वारेच प्राप्त करुन घ्यावा.

३) अवर सचिव, संगणक कक्ष, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांनी प्रस्तुत नियतनाची प्रत विभागाच्या वेबसाईटवर अपलोड करावी.

**( वि. द. शेवडे )**
**अवर सचिव**

प्रत :- १) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
२) निवड नस्ती (कार्यासन, नापु-२२)

## विवरणपत्र

### शासन पत्र क्र. अधापु-२०१५/प्र.क्र.११२/नापु-२२, दि. १६/९/२०१५ सोबतचे विवरणपत्र

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) लाभार्थ्यांपैकी शेतकऱ्यांना द्यावयाच्या अतिरिक्त अन्नधान्याचे नियतन (माहे सप्टेंबर, २०१५)

| अ.क्र | जिल्हा | सुधारीत लाभार्थी सदस्यसंख्या | नियतनाचे परिमाण | | आवश्यक असलेले नियतन | | | दि. ९.९.२०१५ च्या पत्रान्वये देण्यात आलेले नियतन (मे.टन) | | | लाभार्थ्यांच्या सुधारीत संख्येनुसार दि. ९.९.२०१५ रोजीच्या आदेशानुसार मंजूर नियतनापेक्षा देण्यात येत असलेले अधिकचे (अतिरिक्त) नियतन | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | एकूण अन्नधान्य | गहू | तांदूळ | एकूण अन्नधान्य | गहू | तांदूळ | एकूण अन्नधान्य |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | औरंगाबाद | ५७०४४१ | ३ | २ | १७११ | ११४१ | २८५२ | १३०६ | ८७० | २१७६ | ४०५ | २७१ | ६७६ |
| २ | जालना | २२१२८४ | ३ | २ | ६६४ | ४४३ | ११०७ | १५७ | १०५ | २६२ | ५०७ | ३३८ | ८४५ |
| ३ | नांदेड | ७८१०६० | ३ | २ | २३४३ | १५६२ | ३९०५ | ५५५ | ३७० | ९२५ | १७८८ | ११९२ | २९८० |
| ४ | बीड | ६६९८३३ | ३ | २ | २००९ | १३४० | ३३४९ | ५१९ | ३४६ | ८६५ | १४९० | ९९४ | २४८४ |
| ५ | उस्मानाबाद | ४७७०९२ | ३ | २ | १४३१ | ९५४ | २३८५ | ४९१ | ३२७ | ८१८ | ९४० | ६२७ | १५६७ |
| ६ | परभणी | ४०९३४७ | ३ | २ | १२२८ | ८१९ | २०४७ | ४८५ | ३२४ | ८०९ | ७४३ | ४९५ | १२३८ |
| ७ | लातूर | ३८५८७४ | ३ | २ | ११५८ | ७७२ | १९३० | ३३३ | २२२ | ५५५ | ८२५ | ५५० | १३७५ |
| ८ | हिंगोली | २१७१२५ | ३ | २ | ६५१ | ४३४ | १०८५ | ३२२ | २१५ | ५३७ | ३२९ | २१९ | ५४८ |
| ९ | अमरावती | ८०८७७० | ३ | २ | २४२६ | १६१८ | ४०४४ | ६१७ | ४११ | १०२८ | १८०९ | १२०७ | ३०१६ |
| १० | वाशिम | २९७७९१ | ३ | २ | ८९३ | ५९६ | १४८९ | २७१ | १८१ | ४५२ | ६२२ | ४१५ | १०३७ |
| ११ | अकोला | ५४२१०९ | ३ | २ | १६२६ | १०८४ | २७१० | ३०८ | २०५ | ५१३ | १३१८ | ८७९ | २१९७ |
| १२ | बुलढाणा | ५५७५३४ | ३ | २ | १६७३ | १११५ | २७८८ | ३६३ | २४२ | ६०५ | १३१० | ८७३ | २१८३ |
| १३ | यवतमाळ | ४०८६४९ | ३ | २ | १२२६ | ८१७ | २०४३ | १८२ | १२१ | ३०३ | १०४४ | ६९६ | १७४० |
| १४ | वर्धा | ४५३०९१ | ३ | २ | १३६१ | ९०५ | २२६६ | ६९१ | ४६१ | ११५२ | ६७० | ४४४ | १११४ |
| | एकूण | ६८००००० | | | २०४०० | १३६०० | ३४००० | ६६०० | ४४०० | ११००० | १३८०० | ९२०० | २३००० |

(सि. ए. शेवडे)
अवर सचिव

# Government of Maharashtra

No.- ADHAPU-2015/C.R.112/CS-22,
Food, Civil Supplies & Consumer Protection Department, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralay Annex, Mumbai-400 032
Date :- 16th September, 2015.

To,

The General Manager (Mah),
Food Corporation of India,
Regional Office (Maharashtra),
FSD Complex,
Dattapada Road, Rajendra Nagar,
Boriwali (E), Mumbai- 400 066.

**Sub :- Additional Allocation of Foodgrains for APL (Saffron) cardholder farmers not included under NFSA, 2013 for the month of September, 2015.**

**Ref :-** 1) Govt. of India letter No.2/Maharashtra/2015-BP-III , Dt. 16.9.2015
2) State Govt. Letter of even no. Dtd. 16.9.2015

Sir,

Government of India vide its above referred letter dated 16.9.2015 has sanctioned additional allocation at applicable economic cost. Accordingly State Government has issued districtwise allocation orders for the month of September, 2015, vide above referred letter dated 16th September, 2015. (copy enclosed). State Government has also instructed its field authorities to purchase foodgrains at economic cost i.e. Rs. 22670/- per M.T. for Wheat and Rs. 31340/- per M.T. for "A" Grade Rice.

You are therefore requested to release the allocated quota to the nominees of District Collector's as per the statement attached under intimation to this Government.

Yours faithfully,

**(V. D. Shevde)**
**Under Secretary to the**
**Government of Maharashtra**

Copy to:1) Financial Advisor & Deputy Secretary, F.C.S & C.P. Dept, Mumbai.
2) Select file, Desk CS-22.